तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई-४००००१.
PH:2264 1150,2 264 1151, 22620601, 22690602, FAX:2692102
Telegram : Edutech E-Mail : director@dte.org.in Website: http://www.dte.org.in

क्रमांक १ /आढावा बैठक/२०११/ ८३
दिनांक:- सप्टेंबर SEP 2011

प्रति,
सहसंचालक तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालये,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

संचालक /सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

विषय:- आढावा बैठक

तंत्रशिक्षण संचालनालयाअंतर्गत मोडणा-या विविध विषयांबाबतची सद्यस्थिती व कामाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी विभागीय सहसंचालक आणि तंत्रशिक्षण मंडळाचे अधिकारी यांची आढावा बैठक दि.१३ सप्टेंबर, २०११ रोजी सकाळी ११.३० वाजता या संचालनालयात आयोजित करण्यात आली आहे.

बैठकीची विषयसूची

१. विभागीय कार्यालयाअंतर्गत मोडणा-या गट-क आणि गट-ड मधील रिक्त पदे व त्यामधील अपंग व मागासवर्गीय अनुशेषाची पदे भरण्यासाठी विभागीय स्तरावर सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती
२. बिंदूनामावली व जेष्ठतासूच्या अद्ययावत करणेबाबतची कार्यवाही
३. विभागाअंतर्गत करावयाच्या प्रतिनियुक्तीसाठी अनुसरावयाची कार्यपध्दती
४. आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत केली गेलेली कार्यवाही
५. शासकीय संस्था व अनुदानित संस्थांमधील शिक्षकीय पदावरील अधिका-यांच्या पूर्वसेवा जोडून घेणे इ. बाबतच्या प्रकरणांचा आढावा
६. गोपनीय अहवालाची सद्यस्थिती / ५०-५५ वर्षे वय झालेल्या कर्मचारी/अधिकारी यांचे गोपनीय अहवालाचे पुर्नविलोकन प्रकरणे
७. सहाव्या वेतन आयोगाअंतर्गत वेतन निश्चितीची प्रलंबित प्रकरणे व अतिप्रदान वसूलीची कार्यवाही
८. अधिकारी/कर्मचा-यांची बदली प्रकरणे व त्याबाबतची सद्यस्थिती
९. शासकीय संस्थांमध्ये नव्याने सुरु झालेल्या अथवा प्रवेशक्षमता वाढीमुळे आवश्यक असलेली शिक्षकीय व शिक्षकेतर कर्मचा-यांची पदे निर्मितीचे प्रस्ताव / प्रलंबित प्रस्तावाबाबतची सद्यस्थिती/अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या प्रकरणे
१०.अतिरिक्त कार्यभाराबाबत विशेष वेतन मंजूरी प्रकरणी करावयाची कार्यवाही

११.विभागीय चौकशी प्रकरणे व न्यायालयीन प्रकरणांची सद्यस्थिती

१२. बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये अंतर्भूत करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या नावीन्यपूर्ण योजनांबाबतचे प्रस्ताव, नवीन बांधकामे व स्वेच्छानिधीअंतर्गत प्रस्ताव

१३. अकराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत विविध योजनांवर झालेल्या खर्चाचा दि.३१/८/२०११ चा आढावा

१४.राष्ट्रीय सेवायोजना व सामूहिक तंत्रनिकेतन योजना यांच्या अंमलबजावणीबाबतची कार्यवाही

१५.केंद्रशासन पुरस्कृत योजनेअंतर्गत मुलींच्या वसतिगृह बांधकामाबाबतची सद्यस्थिती

१६. अल्पसंख्याक समाजाच्या मुलींसाठी प्रस्तावित वसतिगृहासाठी शासकीय तंत्रनिकेतनाच्या परिसरात उपलब्ध करुन दयावयाच्या जागेबाबतचा अहवाल

१७.भांडारपडताळणी व लेखा आक्षेपाबाबतच्या प्रलंबित परिच्छेदावरील अनुपालनाची सद्यस्थिती / लेखा समिती बैठकांचे आयोजन

१८.जमाखर्चाचा ताळमेळ

१९.आठमाही सुधारीत अंदाजपत्रकाची कामे / पुरवणी मागण्या

२०.अनुदानित संस्थांच्या मूल्यनिर्धारणाबाबत करावयाची कार्यवाही व त्याची सद्यस्थिती

२१. वैद्यकीय देयकांबाबत विभागीय स्तरावर करावयाची कार्यवाही

२२. शासकीय व अनुदानित संस्थांतील अतिरिक्त /अधिसंख्य ठरलेल्या कर्मचा-यांचे समायोजन

२३.शिक्षक /शिक्षकेतर कर्मचा-यांचे प्रशिक्षणाचे प्रस्ताव

२४.विनाअनुदानित संस्थांची पदवी /पदविका प्रवेश प्रक्रिया आणि प्रवेशयादया तपासणी / मान्यतेची कार्यवाही

२५.प्रवेश रद्द आणि शुल्क परतावा प्रकरणी आलेल्या तक्रारीचे निवारण

२६.विनाअनुदानित संस्थांतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांची रिक्त पदे भरण्यासाठी करावयाची कार्यवाही

२७. रिझल्ट फ्रेमवर्क डाक्युमेंट / की परफॉरर्मन्स एरिया मध्ये समाविष्ट असलेल्या मुद्दयांबाबत करावयाची कार्यवाही

२८.महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या अखत्यारित येणारे तंत्रशिक्षण संचालनालयाशी संबंधित विषय

२९.गुणवत्ता सुधार योजनेत विभागीय कार्यालये व म.रा.तं.शि.मंडळाचा सहभाग

३०. वेळेवर उपस्थित होणारे इतर विषय

उपरोक्त विषयासंबंधी स्वयंस्पष्ट टिप्पणीसह सहसंचालक, संचालक/सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांनी व्यक्तिश : बैठकीला वेळेवर उपस्थित राहावे. बैठकीसाठी प्रतिनिधी पाठविण्यात येऊ नये किंवा सोबत मदतनीस आणू नये.

( दयानंद मेश्राम )
सहसंचालक तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत:-

१)श्री.गु.रा.ठाकरे, उपसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई

२)श्री.प्रमोद नाईक, उपसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई

३)डॉ.वि.म.मोहितकर, उपसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई

त्यांनी बैठकीसाठी त्यांचे अधिनस्त कार्यासनाच्या माहितीसह उपस्थित रहावे.